# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती

Email :- roamravati.dte@gmail.com Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721-2573027, 2572577 Fax :- 0721- 257 7913


**तात्काळ**

क्रमांक :- विकाअ/आस्था/वेनि/२०१२/६३६

दिनांक :-

प्रति,

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,
अमरावती/खामगांव/वाशिम/यवतमाळ/मुर्तीजापूर
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ.

**विषय :- सहाव्या वेतन आयोग चुकीची वेतन निश्चिती आंदोलनाबाबत.**

संदर्भ :- १) अध्यक्ष, महाराष्ट्र गव्हरमेंट पॉलीटेक्नीक टीचर्स (गॅझेटेड वर्ग-१) वेलफेअर असो. कराड यांचे पत्र क्र. एमजीपीटीडब्ल्युए/५१६ दि. ३.३.२०१२

२) तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे पत्र क्र. ५(३)/एआयसीटीई/वेनि/२०१२/२२५०१ दि. १२.३.१२

संचालनालयाचे संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रात नमुद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून सदरचे आंदोलन अ.भा.तं.शि. परिषद / शासनाकडुन अंतिम निर्णय हाईपर्यंत करण्यात येवू नये तथापि आपले संस्थेतील शिक्षकांच्या सदरबाब निदर्शनास आणुन देवून सदरची आंदोलनाची कृती बेकायदेशीर व नियमबाहय असल्याबाबत शिक्षकांना निर्देश देवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ई-मेलद्वारे दि. १३.३.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा., मुंबई (का.क्र. ५(३)) यांना माहिती करीता सादर
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१
E-mail :- desk5@dte.org.in Web :- http://www.dte.org.in

क्रमांक : ५(३)/एआयसीटीई/वेनि/२०१२/२२५०१
दिनांक : १२ मार्च, २०१२

प्रति,
अध्यक्ष,
महाराष्ट्र गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक टीचर्स
(गॅझेटेड वर्ग-१) वेलफेअर असोसिएशन,
कराड, जि. सातारा

**विषय : सहावा वेतन आयोग चुकीची वेतन निश्चिती आंदोलनाबाबत...**
संदर्भ : आपले क्रमांक एमजीपीटीडब्ल्यूए/५१६, दिनांक ३ मार्च, २०१२

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन निवेदनाच्या अनुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यांत येत आहे.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांतील शिक्षकांना ६ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत आपण केलेल्या मागणीबाबत या कार्यालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यांत आलेला होता, तथापि, वित्त विभागाने सदरचा प्रस्ताव नामंजूर केलेला आहे.

तसेच दिनांक ५ मार्च, २०१२ रोजी आपली मा. मंत्री महोदय, तसेच अ. भा. तं. शि. परिषदेचे अध्यक्ष यांचेशी झालेल्या चर्चेअंती सदरच्या दुरुस्तीबाबत दोन महिन्यात कार्यवाही करण्याबाबतचे आश्वासन अ. भा. तं. शि. परिषदेच्या अध्यक्षांनी मा. मंत्री महोदयांना दिलेले आहे.

तरी, सदरची वस्तुस्थिती लक्षात घेता, आपण दिलेल्या निवेदनाबाबत फेरविचार करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन, सदरचे आंदोलन अ. भा. तं. शि. परिषद/शासनाकडून अंतिम निर्णय होईपर्यंत करण्यांत येऊ नये.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा. मुंबई

प्रत : सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये. त्यांना कळविण्यांत येते की, सदरच्या निवेदनाच्या अनुषंगाने उपरोक्त वस्तुस्थिती आपल्या अधिपत्याखालील संस्थेतील शिक्षकांच्या निदर्शनास आणून देऊन सदरच्या आंदोलनाची कृती बेकायदेशीर/नियमबाह्य असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणण्यांत यावे. तसेच सदरचे आंदोलन न करण्याबाबत कळविण्यांत यावे. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

D:\Desk-5\Mali\vashre-Nishre-2011.doc



Created with nitro PDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional